Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

**Research Article**

# नागपूरकर मुधोजी भोसले आणि गढा—मंडला संबंध (इ.स. 1772—1788)

**प्रा. डॉ. सुरेश निळकंठराव काळे**
इतिहास विभाग प्रमुख, एच.बी.टी.कला व वाणिज्य महाविद्यालय,
नविन सुभेदार, नागपूर.

**प्रस्तावना :**

मध्ययुगात मध्य प्रदेशाच्या पूर्व व उत्तर भागातील एक विशाल भूप्रदेशावर गोंड जमातीने दीर्घ काळापर्यंत राज्य केले. येथील गोंड राजांचे राज्य पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू होऊन अठराव्या शतकाच्या मध्यापर्यंत टिकून होते. त्यामुळे या प्रदेशाला 'गोंडवाना' म्हटले जाते. गोंडवाना हे नाव मोगलकाळात अस्तित्वात आले. या प्रदेशात गोंडाची लहान—मोठी राज्ये निर्माण झाली. त्यापैकी गढा—मंडला, देवगड, खेरला आणि चंद्रपूर ही चार मोठी गोंड राज्ये जास्त प्रसिध्दीस आली.

गढा (जबलपूर)—मंडला हे गोंडाचे मुख्य ठिकाण होते. यादवराय हा गढा राज्याचा संस्थापक होता. संग्रामशहा हा या घराण्यातील महत्त्वपूर्ण राजा होय. मोगल सम्राट अकबराच्या काळात, अकबराने या राज्यावर आक्रमण करण्यास कडा—माणिकपूरचा सुभेदार अब्दुल मजीद आसफखान यास पाठविले. यावेळी दलपतशाहाची राणी दुर्गादेवी ही अल्पवयीन पुत्र वीर नारायण याच्या नावाने राज्यकारभार करीत होती. अकबरच्या आदेशानुसार आसफखनाने गढा—मांडला राज्यावर आक्रमण करून राणी दुर्गावतीचा पराभव केला. राणी दुर्गावती लढाईत धारातिर्थी पडली. यानंतर गढा—मंडला राज्यावर मोगलांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. मोगलांच्या वर्चस्वाखाली गेल्यानंतर उत्तरोत्तर गढा—मंडला राज्याचा ऱ्हास होत गेला. त्याचाच फायदा पुढे भोसले व पेशवे यांनी घेतला.

गढा—मंडलाच्या अधिकाराबाबत नागपूरकर भोसले आणि मराठा साम्राज्याचा मुख्य प्रधान पेशवे यामध्ये सतत अर्धशतक वाद सुरू होता. उत्तर भारतातील सत्तेबद्दल पहिले पेशवे बाजीराव आणि पहिले रघुजी भोसले यामध्ये स्पर्धा लागली होती. इ.स.1737 मध्ये बाजीराव उत्तेतर आणि माळव्याच्या स्वारीत गुंतला आहे. हे पाहून रघुजीने बाजीरावाला मदत न करता बुंदेलखंडातील गढा—मंडला हा प्रांत जिकून घेतला. बुंदेलखंड पेशव्याच्या वैयक्तिक जहागिरीचा भाग पन्ना नरेश छत्रसालाकडून बाजीरावाला इ.स.1729 मध्ये प्राप्तझाला होता. डिसेंबर 1737 मध्ये पेशवा बाजीरावाने भोपाळच्या युध्दात निजामाचा पराभव केला आणि 7 जानेवारी 1837 रोजी झालेल्या दोराहसराईच्या तहाने निजामाकडून नर्मदा चंबळ नद्यांमधील प्रदेश आणि बुंदेलखंडाचा प्रदेश बाजीरावाला मिळाला. गढा—मंडला हा प्रांत नर्मदा—चंबळ नद्यांच्या मध्ये असून, बुंदेलखंडाचा एक भाग असल्यामुळे गढा—मंडलावर बाजीराव पेशव्याचा कायदेशीर अधिकार प्रस्थापित झाला होता. तेव्हा गढा—मंडलाचा प्रदेश रघुजी भोसल्यांनी जिंकल्यामुळे आणि बाजीरावाला ऐनवेळी सैनिकी मदत न केल्यामुळे बाजीरावाला राग येणे स्वाभाविकच होते. बाजीराव हा स्वतः रघुजी भोसल्यावर स्वारी करण्याच्या विचारात होता. परंतु छत्रपती शाहूमुळे आणि दिल्लीवर नादिरशहाने इ.स.1739 मध्ये आक्रमण केल्यामुळे हे घरगुती तंटे त्याने सोडून दिले.

दुर्दैवाने बाजीराव पेशव्याचे 28 एप्रिल 1740 रोजी रावेरखेडी येथे अकाली निधन झाले. बाजीरावाच्या मुलास बाळाजी बाजीराव (नानासाहेब) यास पेशवेपद न मिळता बाबूजी नाईकास मिळावे याकरिता रघुजी स्वतः कर्नाटकातून सातारा येथे आला. परंतु रघुजीच्या प्रयत्नास यश आले नाही. छत्रपती शाहूंनी 25 जून 1740 रोजी नानासाहेब यास पेशवेपदावर नेमले. त्यामुळे भोसले—पेशवे संबंध अधिकच बिघडले. 1 डिसेंबर 1741 रोजी नानासाहेब पेशवे बरोबर पिलाजी जाधव, महादोबा पुरंदरे, बाजी भीमराव रेठरेकर वगैरे सरदार घेऊन खानदेशातून निघाले. राणोजी शिंदे आणि मल्हारराव होळकरही सामील झाले. त्यांनी मकडाई, नेमाड, शिवनीवरून मार्च 1742 मध्ये गढा—मंडलाच्या राज्यावर आक्रमण केले. या युध्दात गढा—मंडलाचा गोंड राजा महाराजशहा मारला गेला. गढा—मंडला जिंकण्यात आले आणि महाराजशहाचा मुलगा शिवराजशहा याच्याकडून वार्षिक खंडणी चार लाख देण्याचा करार करून गढा—मंडलाचे राज्य शिवराजशहाला परत करण्यात आले. गढा—मंडलाचे वार्षिक उत्पन्न 14 लाख असून, नानासाहेबाने चौथ म्हणून वार्षिक चार लाख रुपये घेतले.

गढा–मंडला नर्मदा नदीच्या उत्तरेकडील व सागर सुभ्याला लागून असल्यामुळे त्याचा समावेश बुंदेलखंडात होतो. बुंदेलखंड पेशव्याची खाजगी जहागीर होती. त्यादृष्टीने गढा– मंडला प्रदेश आपल्या कार्यक्षेत्रात आहे, असे पेशव्यांचे म्हणणे होते. या उलट नागपूरचे रघुजी भोसले यांचे म्हणणे गढा–मंडला प्रदेश नागपूर राज्यालगतचा प्रदेश असल्यामुळे व त्याचे भौगोलिक महत्त्व ओळखून त्यावर आमचा हक्क आहे. असा दावा नागपूरकर भोसले वारंवार करीत असत. गढा–मंडलाच्या हक्काबाबतच्या मतभेदावरून नानासाहेब पेशवे आणि रघुजी भोसले यांच्यात अधिकच तेढ निर्माण झाली.

नानासाहेबांनी गढा–मंडलावर अधिकार प्रस्थापित केल्यामुळे रघुजी भोसल्यांनी 4 मे 1742 रोजी छत्रपती शाहू महारांजाकडे तक्रार केली. तेव्हा सातारा येथे छत्रपती शाहूने भोसले आणि पेशवे यांच्यामधील मतभेद दूर करून समेट घडवून आणला. भोसल्यांचे कार्यक्षेत्र व्हाडपासून कटकपर्यंतचा, बंगाल बिहारपर्यंतचा प्रदेश राहील असे ठरले. हा करार 31 ऑगस्ट 1743 रोजी झाला. या तहानंतर 1744 मध्ये गढा–मंडला प्रांत रघुजी भोसल्यास देण्याचे नानासाहेबांनी कबूल केले होते. त्यानुसार रघुजी याने विठ्ठल बल्लाळ सुभेदार याला गढा–मंडला सुभ्याचा ताबा घेण्यास पाठविले; परंतु पेशव्यांचा अंमलदाराने ताबा दिला नाही. पुढे 14 फेब्रुवारी 1755 रोजी रघुजीचा मृत्यू झाला. त्यानंतर जानोजी भोसले हा नागपूर राज्याच्या गादीवर बसला. जानोजी भोसलेनेही गढा–मंडला जिंकून घेण्यासाठी बरेच प्रयत्न केले. परंतु पुढे पेशवा माधवराव यांच्याशी इ.स.1769 मध्ये कनकापूरचा तह झाल्यामुळे त्याने गढा–मंडलावर आक्रमण केले नाही.

**गढा–मंडलासाठी मुधोजीचे प्रयत्न :**

गढा–मंडलाचा राजा निझामशहा याचा इ.स.1776 मध्ये मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा औरस पुत्र सुमेरशहा याला गादीवर न बसविता दासीपूत्र महिपालसिंह याला गढा–मंडलाच्या गादीवर बसविल्यामुळे सुमेरशहा हा निराश झालेला होता. पुढे शिवराजशहाची पत्नी विलासकुंवरीने कटकारस्थान करून महिपालसिंहाला ठार मारले आणि निजामशहाचा भाऊ धनसिंह याचा मुलगा नरहरीशहा याला गादीवर बसविले. वास्तविक सुमेरशहा हा गादीचा दावेदार होता. परंतु विलासकुवरीनेही त्याला गादीवर न बसविता नरहरीशहाला गादीवर बसविले. त्यामुळे सुमरशहाने आपला पक्ष मजबूत करण्याच्या उद्देशाने नागपूरकर मुधोजी भोसले याची नरहरीशहाविरुध्द मदत मागितली.

सुमेरशहाचे आमंत्रण मिळताच मुधोजीने जानोजी भोसले आणि माधवराव पेशवा यांच्यात 23 मार्च 1769 रोजी झालेल्या कनकपूरच्या कराराचे उल्लंघन करून गढा–मंडला राज्यावर आक्रमण करण्यासाठी इ.स.1776 मध्ये आपले सैन्य पाठविले. तेव्हा मृत राजा शिवराजशाहाची पत्नी विलासकुवरीने आपल्या मंत्र्याला मुधोजी भोसले यांच्याशी समझोता करण्यासाठी त्याच्याकडे पाठविले. गढा–मंडला राज्याचा शासक नरहरीशहा हा असला तरी तो विलासकुंवरीच्या मदतीने गादीवर बसलेला असल्यामुळे प्रत्यक्षात राज्यकारभारावर तिचेच वर्चस्व होते. विलासकुंवरीने मुधोजी भोसले याच्याकडे समझोता करण्यासाठी पाठविलेल्या मंत्राने मुधोजीला तीन लाख पन्नास हजार रुपये देण्याचे मान्य केले. त्यामुळे मुधोजीने आपले सैन्य परत बोलवून घेतले. विलासकुंवरीने मुधोजी भोसलेशी समझोता करून त्याच्या आक्रमणापासून गढा–मंडला राज्याचा बचाव केला. परंतु विलासकुंवरीने मुधोजीशी केलेला समझोता नरहरीशहाने स्वीकारला नाही आणि मुधोजीस विलासकुंवरीने मान्य केलेली साडेतीन लाख रुपयांची रक्कम देण्यास तो तयार झाला नाही. त्यामुळे मुधोजीच्या मनात नरहरीशहा विरूध्द असंतोष निर्माण झाला. पण यावेळी मुधोजी काहीही करू शकला नाही.

पहिले इंग्रज–मराठा युध्द सुरू झाल्यानंतर इंग्रजाचा पूर्ण पराभव करून त्यांना भारताबाहेर हाकलून लावण्याच्या दृष्टीने नाना फडणीसाने ब्रिटीश विरोधी संघ निर्माण केला. त्या संघात पेशवे, हैदर, निजाम व नागपूरचे भोसले यांची एकजूट करून सर्व बाजूंनी इंग्रजावर हल्ला करावा असे ठरले. नाना फडणविसाच्या योजनेनुसार मुधोजी भोसल्यांना बंगालवर हल्ला करावयाचा होता. मुधोजीने बंगालवर मनापासून हल्ला करून इंग्रजांना जेरीस आणावे यासाठी नाना फडणीसाने भोसल्यांसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या गढा–मंडला प्रांताच्या सनदा मुधोजीचा मुलगा खंडोजी ऊर्फ चिमणाबापू यांच्या नावे करून त्या मुधोजीस दिल्या.

गढा–मंडलावर पेशव्यांचा सागर येथील प्रतिनिधी विसाजी गोविंद चांदोरकर यांनी एप्रिल 1780 मध्ये आक्रमण केले आणि गढा–मंडलाचा राजा नरहरीशहा याला कैद करून सुमेरशहाला गादीवर बसविले. ही बातमी मुधोजी भोसलेस कळताच तो क्रोधीत झाला. कारण नाना फडणीसाने मुधोजीचा मुलगा चिमणाबापू याच्या नावाने गढा–मंडलाची सनद मुधोजीला दिली होती. पेशव्यामार्फत सनद दिली असतांना पेशव्यांचा सागरचा प्रतिनिधी विसाजी गोविंद चांदोरकर गढा–मंडलावर आक्रमण करून संतापला आणि लवकरच एप्रिल 1780 मध्ये नाना फडणीसांना पत्र लिहून गढा–मंडलावरील विसाजीच्या आक्रमणाविषयी व अधिकाराविषयी नाराजी व्यक्त केली.

**मुधोजीचा इंग्रजांशी तह; चतुःसंघातून बाहेर :**

पहिल्या इंग्रज–मराठा युध्दात नाना फडणीसाने इंग्रजाविरूध्द तयार केलेल्या अखिल भारतीय कटात मुधोजी भोसले सामील व्हावा आणि त्याने इंग्रजाविरुध्द बंगालवर स्वारी करून इंग्रजांना पिटाळून लावावे. यासाठी नानाने मुधोजीला गढा–मंडला प्रांताची सनद मुधोजी पुत्र खंडोजीच्या नावे दिली. परंतु प्रत्यक्षात मात्र पेशव्यांचा सागरचा प्रतिनिधी विसाजी गोविंद याने, मुधोजीने पेशव्यांचा नागपूर येथील वकील सदाशिवराम याच्यामार्फत गढा–मंडला मिळावा यासाठी प्रयत्न केले,

पण त्याला यश मिळाले नाही. तेव्हा मुधोजीने गढा–मंडला मिळविण्यासाठी इंग्रजांची मदत घेण्याचे ठरविले. त्यादृष्टीने त्याने हालचाली सुरू करून मुधोजी भोसले पुत्र खंडोजी ऊर्फ चिमणाबापू याने इंग्रजांशी 6 एप्रिल 1781 रोजी तह केला. या तहानुसार इंग्रजांनी भोसल्यांना गढा–मंडला जिंकून देण्याचे आश्वासन दिले. त्यावर विश्वास ठेवून मुधोजी भोसले नानाच्या इंग्रजविरोधी कटातून बाहेर पडले व इंग्रजास मदत केली.

**पेशव्यांचा सागर येथील प्रतिनिधी – नरहरीशहा संघर्श :**

याआधी उल्लेख केल्याप्रमाणे इ.स.1782 मध्ये सुमेरशहाला गादीवरून पदच्युत केले. विसाजी गोविंद चांदोरकर याने पुन्हा नरहरीशहाला गढा–मंडलाच्या गादीवर बसविले आणि गंगागीर महंत याला त्याचा दिवाण नेमले. विसाजीच्या मदतीने नरहरीशहा गादीवर बसल्यामुळे सर्व सत्ता विसाजीच्या हातात होती. राजधानी मंडला येथे विसाजीचा प्रतिनिधी मोरो विश्वनाथ डिंगणकर हा सर्व कारभार पाहत होता. नरहरीशहा हा केवळ नाममात्र शासक होता. नरहरीशहाला नाममात्र शासक राहणे पटले नाही. त्याने विसाजी व त्याचा प्रतिनिधी मोरो विश्वनाथ डिंगणकर यांचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी योजना आखली. नरहरीशहाचा दिवाण गंगागीर महंत याने नरहरीशहाला विसाजीविरूध्द योजनेस मदत केली. गंगागीर महंतने आपल्यासोबत भगवंतगीर, चौरागढला असलेला शहादतखान, लक्ष्मणसिंह पासवान आणि अजितसिंह लोधी या सर्वांनी नरहरीशहाला मदत केली.

**पेशव्यांच्या सागर येथील प्रतिनिधीचा भोवट :**

नरहरीशहाने गंगागीर महंताच्या मदतीने विसाजी गोविंद चांदोरकर विरुध्द ऑगस्ट 1782 मध्ये युध्द घोषणा केली व सात हजार सैनिकांसह चालून गेला. त्यावेळी विसाजीचे सैन्य काल्पीला बाळाजी गोविंद आणि गंगाधर गोविंद या खेर बंधूचा मदतनीस इंग्रजाविरुध्द लढण्यास गुंतले होते. मोरो विश्वनाद्यथ डिंगणकर मंडला येथे होता. विसाजी गोविंद व दादो महाजनी अगदी कमी सैन्यासह गढा येथे होते. ही योग्य वेळ साधून नरहरीशहा आणि गंगागीर महंत यांनी सैन्यासह 23 ऑगस्ट 1782 रोजी विसाजी गोविंद चांदोरकर व दादो नारायण महाजनी याच्यावर आक्रमण केले. त्यांनी काही वेळपर्यंत प्रतिकार केला; परंतु शत्रूपक्षासमोर टिकाव लागला नाही. शेवटी विसाजी गोविंद चांदोरकर आणि दादो नारायण महाजनी 400 सैनिकांसह ठार मारले गेले. या युध्दात विसाजीकडील एकही सैनिक जिवंत राहिला नाही. पन्नास–शंभर घोडेस्वारही मारले गेले.

**मोरो विश्वनाथ डिंगणकर यास मदत करण्यास मुधोजीची टाळाटाळ :**

विसाजी व दादो नारायण याच्या मृत्यूने नरहरीशहा व त्याच्या समर्थकांचा उत्साह वाढला आणि ते सर्व विसाजीच्या समर्थकांविरूध्द सक्रिय झाले. सिवनी छपऱ्याचा जमीनदार महंमद अमीनखाने याने शस्त्र उचलले. बचई व श्रीनगर येथील मराठ्यांच्या चौक्या उठवून सिंगपूर येथे नेण्यात आल्या. महाबलीसिंह नावाच्या जमीनदाराने मंडला येथे असलेला विसाजीचा प्रतिनिधी मोरो विश्वनाथ डिंगणकर याला वेढा दिला. काही सरदारांनी मोरो विश्वनाथ डिंगणकर याच्या रसद पुरवठ्याची सर्व मार्गे बंद केली. शत्रूच्या कोंडीत सापडलेला याने त्रासून नरहरीशहाच्या समर्थकांना सागरला जाण्याची अनुमती मागितली, तेव्हा त्यांनी अनुमती दिल्याने मोरो विश्वनाथ सागरला गेला. मोरो विश्वनाथ डिंगणकर यांच्या सैन्याची स्थिती अत्यंत बिकट झाली होती. अशावेळी मोरो विश्वनाथ डिंगणकर याने सदाशिवराम यांच्यामार्फत सेनाधुरंधर मुधोजी भोसले यांची मदत मागितली तेव्हा सुरुवातीला मुधोजी भोसले मदतीसाठी तयार झाला, परंतु त्याचवेळी गंगागीर महंतने छपाराचा जमीनदार महमंद अमीनखान याच्यामार्फत मुधोजी भोसलेंशी संधान बांधले. मुधोजी भोसले याने सागरच्या सैन्याला मदत करू नये त्या मोबदल्यात नरहरीशहाकडून मुधोजी भोसलेस काही रक्कम देण्यात येईल – असे अमीनखानाने गंगागीर महंतामार्फत मुधोजीस कळविले. त्यामुळे मुधोजीने सैन्याच्या खर्चाच्या रकमेची सबब पुढे करून सागरच्या सैन्याच्या मदतीसाठी सैन्य पाठविण्यास टाळाटाळ केली.

**मोरो विश्वनाथ डिंगणकरचा गढा–मंडलावर ताबा :**

विसाजी गोविंद चांदोरकर याच्या मृत्यूनंतर नरहरीशहाचे समर्थक सागरच्या सैन्याविरूध्द सक्रिय झाले. त्यांचा उत्साह वाढला. त्यांनी विसाजीचा प्रतिनिधी मोरो विश्वनाथ डिंगणकर याला मंडला येथे कोंडीत पकडले त्यावेळी सागरच्या सैन्याची स्थिती अत्यंत बिकट झाली. तेव्हा मोरो विश्वनाथ डिंगणकराने नरहरीशहाच्या समर्थकांना सागरला जाण्याची अनुमती मागितली आणि त्यांनी अनुमती दिल्यानंतर तो सागरला गेला. त्यानंतर त्याने सागरच्या सैन्याला एकत्र करून गंगागीर महंत आणि नरहरीशहावर आक्रमण केले आणि त्यांचा पराभव केला. डिसेंबर 1782 मध्ये गढा–मंडलावर आपला अधिकार प्रस्थापित केला. यावेळी गंगागीर महंत व नरहरीशहा हे चौरागड किल्ल्यावर होते. सागरच्या सैन्याने जुन 1784 मध्ये चौरागडावर आक्रमण करून किल्ला जिंकून घेतला. नरहरीशहा व गंगागीर महंत यांना कैद करण्यात आले. गंगागीर महंताला हत्तीच्या पायाखाली देऊन ठार मारण्यात आले, तर नरहरीशहाला खूरईच्या किल्ल्यात कैदेत ठेवण्यात आले.

**गढा–मंडलासाठी मुधोजी भोसलेचे प्रयत्न :**

पहिले इंग्रज–मराठा युध्द सुरू असतांना इंग्रजांच्या मदतीने गढा–मंडला मिळविण्यासाठी 6 एप्रिल 1781 रोजी इंग्रजांशी तह करून मुधोजी भोसले नाना फडणीसाच्या इंग्रजविरोधी संघातून बाहेर पडला. नाना फडणीसास या तहाची बातमी कळताच त्याने मुधोजी भोसलेस खरमरीत पत्र लिहून धमक्या दिल्या; त्यामुळे मुधोजी घाबरला व स्वतः पुण्यास गेला. केलेल्या कर्माबद्दल त्याने नाना फडणीसाजवळ पश्चात्ताप व्यक्त केला. पुन्हा पेशव्यांविरूध्द आपण इंग्रजास मदत करणार नाही, असे त्याने कबूल केले. तसेच माधवराव पेशव्याशी जानोजी भोसलेने इ.स.1769 मध्ये कनकापूर येथे जो तह केला होता, त्याप्रमाणे प्रामाणिकपणे वागण्याचे त्याने कबूल केले. त्यामुळे नाना फडणीसाने पुनः मुधोजीपुत्र खंडोजीच्या नावाने गढा–मंडलाच्या सनदा दिल्या. त्याप्रमाणे लेखी करारमदार झाले.

मुधोजीला गढा–मंडलाची सनद मिळाल्यावर त्याने प्रत्यक्ष ताबा घेण्याकरिता मे 1785 मध्ये बापूजी मोरेश्वर याला पाठविले. इकडे नाना फडणीसाने गढा–मंडलाच्या सनदा आपला कारकून मोरो गोविंद यांच्याबरोबर देऊन त्याला बाळाजी गोविंदकडे पाठविले. परंतु यावेळी बाळाजी गोविंद, खंडेराव हरी भालेराव बरोबर बुंदेलखंडातील कालिंजर घेण्याच्या मसलती करण्यात गुंतलेला असल्यामुहे त्यांनी गढा–मंडलाचे हस्तांतरण भोसल्याकडे करण्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले. तेव्हा सागरचा दिवाण लक्ष्मीनारायण भटजी काशीवर पन्ना येथे आला आणि त्यांनी सनदा घेऊन येणारा कारकून मोरो गोविंद व भोसल्यांचा माणूस बापूजी मोरेश्वर यांची भेट घेतली. तेव्हा बापूजी मोरेश्वर याने सनदेनुसार गढा–मंडला देण्याविषयी सागरचा दिवाण लक्ष्मीनारायण भटजी काशीवर यास सांगितले. त्यावर सागरच्या दिवाणानी बापूजी मोरेश्वर यास स्पष्ट सांगितले की, गढा–मंडला घेण्यास 31 लक्ष रुपये खर्च आला; त्यामुळे 31 लक्ष रुपये मिळाल्यावर गढा–मंडला देण्यात येईल. यावर नाना फडणीसाचा कारकून मोरो गोविंद म्हणाला की, पुणे येथे मुधोजी भोसल्यांनी तीन लाख रुपयांचा भरणा केला आहे. उरलेल्या रकमेबाबत बोलणी होऊन पेशवे, नाना फडणीस, हरिपंत फडके यांच्या अनुमतीने गढा–मंडलाची सनद आणली आहे. तेव्हा, आपण याबाबत आक्षेप घेण्याचे कारण नाही. यानंतर सागरचा दिवाण लक्ष्मीनारायण भटजी काशीकर याने विचार करून उत्तर दिले की, आम्ही बारा दिवसांनी चौरागडचा उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील प्रदेश करार करून लिहून देऊ.

सागरचा दिवाण गढा–मंडलाचा ताबा देण्यास टाळाटाळ करीत असल्याची बातमी मुधोजी भोसले यास कळताच, त्याला या गोष्टीचा फार राग आला. तेव्हा फौज पाठवून जबरदस्तीने गढा–मंडलाचा ताबा मिळविण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, असा विचार मुधोजी भोसले याने करून पांडुरंग गणेश याचा भाऊ सिताजी गणेश व वऱ्हाड प्रांताचा सुभेदार विठ्ठल बल्लाळ यांना गढा–मंडलाचा ताबा घेण्यासाठी पाठविण्याचे निश्चित केले. परंतु नंतर त्याने हा बेत रद्द केला. ही बातमी बुंदेलखंडाचे मामलेदार बाळाजी गोविंद खेर यास कळताच त्याने नाना फडणीसास कळविले की, मोठ्या परिश्रमाने गढा–मंडला जिंकण्यात आला. या कामात मातब्बर थोर माणूस विसाजी गोविंद चांदोरकर जिवानिशी गेला. विसाजीच्या मृत्यूनंतर गोंडाविरूध्द लढत असलेल्या सागरच्या सैन्याची परिस्थिती बिकट झालेली असतांना मुधोजीने त्यांना मदत केली नाही. त्यामुळे गढा–मंडलावर मुधोजी भोसले याचा नैतिक अधिकार पोहोचत नाही.

याच दरम्यान इ.स.1786 मध्ये बदामी येथे नाना फडणीस आणि सेनाबहादूर खंडोजी भोसले यांच्यात मढा–मंडलाबाबत मतभेद निर्माण झाल्यामुळे नानांनी त्वरित बाळाजी गोविंद खेर यास कळविले की, गढा–मंडलाचा ताबा भोसल्याच्या माणसास देऊ नये. ताबा देण्याबाबत आम्ही मागाहून लिहून पाठवू. नाना फडणीसाकडून वरीलप्रमाणे आदेश असल्यामुळे बाळाजी गोविंद खेर याने भोसल्याचा वकील मोरो गोविंद यास स्पष्ट बजाविले की, पुण्याहून पेशव्याची गढा–मंडलाबाबत नवीन सनद आल्यानंतर गढा–मंडलाचा ताबा भोसल्यास देण्यात येईल. त्याचबरोबर सागरचा दिवाण लक्ष्मीनारायण काशीकर यानेही भोसल्यांचा वकील बापुजी मोरेश्वर याला सांगितले की, गढा–मंडला प्रांत पेशव्यांनी बाळाजी गोविंद खेर यास कायमचा दिला आहे. ही बातमी बापूजी मोरेश्वरमार्फत मुधोजी भोसले यास कळताच नाईलाजास्तव मुधोजी भोसलेने मार्च 1788 मध्ये बापूजी मोरेश्वरला नागपूरला परत बोलावून घेतले आणि पेशवे लिहितील त्याप्रमाणे आम्ही गढा–मंडलाबाबत ठरवू असे म्हटले.

मुधोजी गढा–मंडलाचा ताबा घेण्यास अयशस्वी ठरला, याचे सर्वात महत्त्वाचे कारण मुधोजी भासेले व मुत्सद्देगिरीच्या बाबतीत कमी ठरला व त्याचा स्वभावही कारणीभूत ठरला, असे दिसून येते.

**संदर्भ सुचीः**


1) काळे या.मा., 'नागपूरकर भोसल्यांचा इतिहास' विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर 1979
2) अंधारे भा.रा., 'देवगडचे गोंड राजे; विश्वभारती प्रकाशन, नागपूर 2004
3) सरदेसाई गो.स., व काळे या.मा., आणि वाकसकर वि.स., 'ऐतिहासिक पत्रे, यादी वगैरे' समर्थ भारत,छापरप्राना, पूणे, 1933
4) मिश्र सुरेश, 'मध्यप्रदेश के गोंड राज्य' राणी दुर्गादेवी विश्वविद्यालय, जबलपूर 1986
5) शेजवलकर त्र्य.रा., 'नागपूर अफेअर्स भाग–1' डेक्कन कॉलेज, पूणे, 1954